**MHKO050019182009**

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १८/२०१० मधील नि. २६६ वरील आदेश</u>

(मिना छाये वि. आनंदा महाजन वगैरे )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२ दत्तात्रय महाजन हे दिनांक १३.०८.२०२५ रोजी मयत झालेमुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ दत्तात्रय रामकृष्ण महाजन हे दिनांक १३.०८.२०२५ रोजी मयत झाले आहेत. तरी प्रतिवादी क्र.२ यांना विजय दत्तात्रय महाजन- मुलगा, रामदास दत्तात्रय महाजन- मुलगा व सौ. तुळसा म्हेतर- मुलगी अशी तीन अपत्ये असून ती एकमेव कायदेशीर व सरळ वारस आहेत. तरी सदर वारसांना दाव्याचे कामी सामील करुन घेणेत यावी अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादींनी याच अर्जाचे मागे म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. सदरचा वारस रेकॉर्डचा अर्ज मुदतीत आहे किंवा कसे याबाबत अर्जात उल्लेख केलेला नाही. तसेच वारसांना नोटीस काढणे आवश्यक व जरुरीचे आहे.  त्यामुळे, अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजुंचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचा दावा वादीने वाटपासाठी, कब्जासाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ दत्तात्रय महाजन हे दिनांक १३.८.२०२५ रोजी मयत झाले आहेत. वादीतर्फे प्रतिवादी क्र.२ दत्तात्रय यांचा मृत्यु दाखला नि.क्र. २७० कडे दाखल केला आहे. प्रतिवादी मयत झालेनंतर सदरचा अर्ज मुदतीत आहे. तसेच दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेसाठी सदरचा अर्ज मंजुर करणे योग्य व न्यायोचित वाटते. दावा वाटपाचा असल्याने प्रतिवादी क्र.२ दत्तात्रय यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणे जरुरीचे आहे. त्यामुळे, वादीचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. म्हणुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.10.10 11:16:14 +0530

इचलकरंजी

दिनांक – ०९.१०.२०२५

**( जी. एम. नदाफ )**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.